# प्रेसनोट

जा.क्र. ७२३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २१/१०/२०१७

## हौतात्म्य पत्करणा–या जवानांना श्रद्धांजली पोलिस मुख्यालयात हुतात्मादिन

भंडारा:– कर्तव्य पथावर अग्रेसर होत असता हौतात्म्य पत्करणा–या वीर पोलीस जवानांची आठवण म्हणुन संपूर्ण देशभर पोलीस प्रशासनाद्वारे २१ आक्टोबर हा पोलीस हुतात्मा स्मृतीदिन म्हणुन पाळला जातो. त्यानिमित्ताने आज दि. २१ ऑक्टोबर पोलीस मुख्यालय, भंडारा येथील पोलीस हुतात्मा स्मारक स्मृतिस्तभं येथे स. ०८.०० वा. श्रध्दांजली व शोक सलामीचे आयोजन करण्यात आले. मा. अपर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर यांच्या उपस्थितीत, प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह) एस. टी. घुसर पोलीस उपविभागीय अधिकारी भंडारा जोगदंड, पोलीस उपविभागीय अधिकारी पवनी टिक्कस, पोलीस उपविभागीय अधिकारी तुमसर साळी साहेब, हे उपस्थित होते.

यावेळी पोलीस मा. अपर पोलीस अधिक्षक रश्मि नांदेडकर यांनी आजचा दिवस पोलीस प्रशासनासाठी अत्याधिक महत्वाचा दिवस आहे. हयावर्षी देखील संपुर्ण भारतातून एकूण – ३७० पोलीस अधिका–यांनी/कर्मचा–यांनी आपले कर्तव्य बजावीत असतांना आपल्या मातृभुमीच्या संरक्षणार्थ प्राणाची आहुती दिलेली आहे. त्यांना शतशः वंदन असे बोलून शहीद पोलीसांच्या स्मृतिंना उजाळा दिला. तसेचे २१ ऑक्टोबर १९५९ रोजी लडाख हद्दीत भारत तिबेट सीमेवर १६ हजार फुट उंचावर कडाक्याच्या थंडीत केंद्रीय राखीव पोलीस दलाचे १० शिपाई गस्त घालत असताना 'हिंदी–चिनी भाई भाई' असा नारा लावणा–या चिनी सैनिकांनी त्यांच्यावर अकस्मात हल्ला केला. याची चाहूल लागताच सीमेच्या रक्षणार्थ अपुरे मनुष्यबळ व अपुरे शस्त्रे असल्याची पर्वा न करता जवानांनी मातृभूमीसाठी प्राणपणाने लढून हौतात्म्य पत्करले. याच्यावर पोलिस इतमात अंत्यसंस्कार करण्यात आले. ही घटना घडली त्या हॉट्स्प्रिंग येथे या वीरांचे स्मारक उभारले आहे. तेव्हापासुन हा दिवस पोलिस हुतात्मादिन म्हणुन पाळला जातो.तेथे संपुर्ण भरतातील पोलीसांनी या विराचे स्मारक उभारले आहेत. स्मारकावर शब्द अंकीत आहेत. " when you go home tell them of us. For their tomorrow we gave up our todoy"

सदर प्रसंगी कर्तव्य बजावतांना शहीद झालेल्या शहीदाचे नावे पोलीस उपविभागीय अधिकारी श्री. टिक्कस, श्री. साळी साहेब यांनी वाचन केले. तसेच भंडारा जिल्हयातील शहीद पोलीस अधिकारी/कर्मचारी पोउपनि दिपक सखराम रहिले, पोहवा. योगेश्वर तुकाराम हेडाऊ, पोशि. शिवलाल सिताराम बरैया, पो.शि. दामोधर शंकर वडतकर, पो. शि. रविकुमार सेवकराम जौंजाळ, पो. शि. ईशांत कुमार रामरतन भुरे, पो. शि. भोजराज शंकर बांभरे, पो. शि. मुलचंद शामराव भोयर, पो. शि. मनोज शालीकराम गि–हेपुंजे, पो. शि. बि. डी. बांते/जीडी, पो. शि. बांलपांडे सी. आर. पी. एफ. यांच्या स्मृतींना ही उजाळा देण्यात आला. त्याचप्रमाणे पोलीस अधिकारी व कर्मचारी तसेच जिल्हातील शहिद अधिकारी व कर्मचारी यांचे कुटूंबीय सदर कार्यक्रमात उपस्थित होते. तसेच पोलीस बॅन्ड पथक यांनी शहरात चौका मध्ये राष्ट्रभक्तीपर गितांच्या धुन वाजवुन श्रध्दाजली अर्पण केली. शहीद पोलीस अधिकारी व कर्मचारी यांनी ज्या शाळा/ कॉलेज मध्ये शिक्षण घेतले त्या शाळा/कॉलेज मध्ये देखील आज रोजी शहीद पोलीस कर्मचा–यांच्या स्मृतींना उजाळा देवुन श्रध्दाज़ली अर्पण करण्यात आली.

**(पोउपनी. ए. बी. तुळजेवार)**
**अपर पोलीस अधिक्षक**
**वाचक फौजदार भंडारा**
दुरध्वनी.क्र. ७७६८८६९९७७

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.